## निशाणी क्र. १३९ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आज्ञावली ६ नियम १७ नुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ यांनी नि.क्र. १४३ ला म्हणणे दिले आहे. प्रतिवादी क्र. २ ते ८ व १० यांना पुरेशी संधी मिळून देखील त्यांनी म्हणणे दिले नाही. वादी व प्रतिवादी क्र. १ तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

३. वादींनी प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे वाटप होण्यासाठी दाखल केला आहे. वादी यांना सि.स.क्र. ५०५, ग्रामपंचायत मिळकत क्र. ३५२ ही मिळकत या वाटपाच्या दाव्यामध्ये समाविष्ट करावयाची आहे, या मिळकतीबाबत दि. १०/०१/१९९२ रोजी झालेल्या खरेदीपत्राच्या अनुषंगाने दाव्यामध्ये कथन करावयाचे आहे व दावा मिळकतीचे जे मुल्यांकन केलेले आहे त्यामध्ये वादींना दुरुस्ती करावयाची आहे असे दिसून येते. वाटपाच्या दाव्यामध्ये एकत्र कुटुंबाच्या सर्व मिळकती समाविष्ट असणे आवश्यक आहे. तसेच अशा मिळकतींची पार्श्वभूमी बाबत कथन करणे आवश्यक आहे. परिणामी, अशा मिळकतींची आकारणी करणे आवश्यक व गरजेचे आहे. सदरची नियोजित दुरुस्ती ही दावा मिळकती संदर्भात असल्यामुळे ती अतिशय आवश्यक व महत्त्वाची वाटते. वादी व प्रतिवादीमधील सर्व मिळकतींच्या वाटपाबाबतचे वादमुद्दे कायमपणे गुणावगुणावर निवारण होण्यासाठी सदर नियोजित दुरुस्तीस परवानगी देणे न्यायोचित वाटते. अशा दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादींना जादा

कैफियत देण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे त्यांचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. याकामी अदयाप मुद्दे निघाले नाहीत, पुरावा सुरु झाला नाही असे दिसून येते. या परिस्थितीत हा दुरुस्तीचा अर्ज मंजूर होणेस कोणतीही अडचण वाटत नाही. सबब, या कारणास्तव हा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे:

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी पुढील तारखेपर्यंत दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दावा दुरुस्ती प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

GIRISH SUDARSHAN MANE
Digitally signed by GIRISH SUDARSHAN MANE
Date: 2023.01.23 17:17:29 +0530

स्थळ : कोरेगाव ( गि. सु. माने )
दिनांक : २०/०१/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.